# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO ९००१:२०१५) (ISO/IEC २७००१:२०१३)

शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४ था मजला, ४९, खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई — ४०० ०५१

दू.क्र.: ०२२-२६४७८७९५/ ५३१/ २९६/ २६४७७२०९ (वै.) फॅक्स : ०२२-२६४७३९७९

संकेतस्थळ : www.msbte.org.in ई-मेल : secretary@msbte.com


**महत्वाचे परिपत्रक**

जा. क्र.मरातंशिमं/का-४०/उ.प.२०२०/परीक्षा अर्ज/ ०४१

दिनांक : 10 JUN 2020

प्रति,

प्राचार्य,

मंडळाशी संलग्नित सर्व संस्था.

विषय : **विहित मुदतीत उन्हाळी परीक्षा २०२० चे परीक्षा अर्ज भरलेले नाहीत अशा विद्यार्थ्यांना परीक्षा अर्ज भरण्याची एक संधी देण्याबाबतचे वेळापत्रक...**

संदर्भ : १) मंडळाचे शैक्षणिक वर्ष २०१९-२० चे ॲकेडेमिक कॅलेंडर क्र. MSBTE/D-४०/Academic Calendar/B२/२०१९/५९, दि. १६/०४/२०१९

२) मंडळाचे महत्वाचे परिपत्रक क्र.मरातंशिमं/का-२०/परीक्षा-२०२०/८३, दि. १५/०५/२०२०.

३) मंडळाचे महत्वाचे गोपनीय परिपत्रक क्र.मरातंशिमं/का-४०/लले/बी-९१/२०२०/४२, दि. ०८/०६/२०२०.

उपरोक्त संदर्भ क्र. १ च्या ॲकेडेमिक कॅलेंडरनुसार उन्हाळी परीक्षा २०२० करीताचे परीक्षा अर्ज विभागीय कार्यालयामार्फत निश्चित करण्याची अंतिम तारीख दि. २० फेब्रुवारी, २०२० अशी निर्धारित केलेली होती. मंडळाने संदर्भ क्र. २ च्या पत्रान्वये विहित मुदतीत परीक्षा अर्ज भरु न शकलेल्या विद्यार्थ्यांना परीक्षा अर्ज भरण्याकरिता एक संधी उपलब्ध करुन देण्यात येईल असे कळविलेले होते. तसेच ज्या विद्यार्थ्यांचे उन्हाळी परीक्षा २०२० चे परीक्षा अर्ज विभागीय कार्यालयामार्फत कन्फर्म केले आहेत अशा विद्यार्थ्यांबाबत निकाल प्रक्रिया करण्यात येईल असेही संदर्भ क्र. २ अन्वये कळविले होते. त्यानुसार विहित मुदतीत अर्ज न भरु शकलेल्या विद्यार्थ्यांकरता एक संधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. त्याचे वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | प्रक्रिया | कालावधी |
|---|---|---|
| १. | विद्यार्थ्यांनी Login मधून परीक्षा अर्ज भरणे | ११ ते १५ जून, २०२० |
| २. | विद्यार्थ्यांनी भरलेले / संस्थेमधून भरलेले परीक्षा अर्ज संस्थेने Institute Login मधून कन्फर्म करणे. | ११ ते १६ जून, २०२० |
| ३. | विभागीय कार्यालयांनी संस्थांनी कन्फर्म केलेले परीक्षा अर्ज निश्चित करणे | १६ ते १८ जून, २०२० |

विद्यार्थ्यांनी उन्हाळी परीक्षा २०२० करीताचे परीक्षेचे अर्ज विहित कालावधीत भरुन परीक्षेचे शुल्क आपल्या संस्थेशी संपर्क साधून Online पध्दतीने अथवा प्रचलित पध्दतीने संस्थेस अदा करावे व संस्थेमार्फत परीक्षा अर्ज निश्चित केला असल्याची खात्री करुन घ्यावी. तसेच संस्थांनी सुध्दा विद्यार्थ्यांनी भरलेले अर्ज व प्राप्त परीक्षा शुल्क तपासून विहित कालावधीत सर्व विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज निश्चित करावे व विभागीय कार्यालयास विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क Online द्वारे अदा करावे व विभागीय कार्यालयाशी संपर्क साधून संस्थांनी निश्चित केलेले परीक्षा अर्ज विभागीय कार्यालयाने निश्चित केल्याची खात्री करुन घ्यावी.

परीक्षा अर्ज भरण्याची ही शेवटची संधी असून आपल्या संस्थेतील सर्व विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज भरुन घेतल्याबाबतचे हमीपत्र संस्थेच्या लेटरहेडवर प्राचार्यांच्या स्वाक्षरीने ई-मेलद्वारे विभागीय कार्यालयास देणे आवश्यक राहील.

संदर्भ क्र. ३ च्या पत्रानुसार अंतिम सत्र/वर्ष वगळून नियमित विद्यार्थ्यांना अंतर्गत गुण देण्याबाबत कळविले होते. त्या अनुषंगाने या परिपत्रकाद्वारे शेवटची संधी घेऊन परीक्षा अर्ज भरलेल्या व विभागीय कार्यालयाने निश्चित केलेल्या विद्यार्थ्यांच्या अंतर्गत गुणाच्या E-marksheet दि. २० जून, २०२० रोजी Non Theory E-marksheet Login मध्ये देण्यात येतील अशा विद्यार्थ्यांचे अंतर्गत गुण भरण्याची प्रक्रिया संदर्भ ०३ मध्ये नमूद केलेल्या वेळापत्रकानुसार करण्यात यावी.

तरी सर्व प्राचार्यांनी आपल्या संस्थेतील विहित मुदतीत उन्हाळी परीक्षा २०२० करीता परीक्षा अर्ज न भरलेल्या विद्यार्थ्यांना परीक्षा अर्ज भरण्याबाबतचे वेळापत्रक अवगत करुन त्यांचे उन्हाळी परीक्षा २०२० चे परीक्षा अर्ज विहित कालावधीत भरले जातील याची दक्षता घ्यावी.

(विजय र. जाधव)
प्र.सचिव
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई.

प्रत माहितीसाठी -
मा. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई.

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी —
उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, औरंगाबाद व नागपूर.